श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# Nit Document

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.

## मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे नारळवडी बनविण्यासह पॅकिंगकरण्यापर्यंतच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

## महाप्रसादाचे नारळवडी बनविण्यासह पॅकिंगकरण्यापर्यंतच्या कामाचा कंत्राट कालावधी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२५ (दोन वर्षाकरीता)

: ई–निविदा सूचना :

मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे नारळवडी बनविण्यासह कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | – दिनांक. ०२ मे मंगळवार, २०२३ |
| निविदापुर्व बैठक दिनांक | – दिनांक १२ मे बुधवार, २०२३ |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – दिनांक १५ सोमवार, २०२३ सायं ५ वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | – दिनांक. १७ बुधवार, २०२३, दुपारी १२.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | – दिनांक १७ बुधवार,२०२३, दुपारी २.०० वा. |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

( श्रीमती.नंदा राउत )
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारी महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

## महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" या कामाच्या कंत्राटाचा कालावधी कार्यादेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२४ पर्यंत



| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती. | ३ |
| २ | ई–निविदेच्या अटी व शर्ती. | ४ ते ८ |
| ३ | महाप्रसादाची नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे या कामाचा तपशील | ९ |
| ४ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे | १० |
| ५ | निविदाधारकाने लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची कागदपत्रे. | २० |
| ६ | हमीपत्र (नमुना) | २२ |
| ७ | निविदा धारकाबाबतची माहिती. (नमुना) | २४ |
| ८ | मागील ३ व ाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सी. ए. यांचे प्रमाणपत्र (नमुना) | २६ |
| ९ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचेबीड ऑफ कोटेशनचा (BOQ) तपशील. | २८ |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती

१) महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. निविदा ऑनलाईन भरावयाची असल्यामुळे तांत्रिक निविदा (Technical Bid) मागविण्यात येत आहे. सदर लिफाफ्यामध्ये बीड ऑफ कोटेशन (BOQ) माहिती देवू नये.(Commercial)

२) महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे", या कामाचे कंत्राट देण्याकरीता (पान क्र. १० वरील) कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) मध्ये अपलोड करावी. तसेच तांत्रिक निविदा (Technical Bid) च्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी निविदा शुल्क (Tender Fee) रक्कम रु. ३,०००/– व बयाना रक्कम (EMD) रक्कम रू. ३०,०००/– इतकी ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही/मिळणार नाही.

४) निविदा शुल्क रक्कम व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी लागेल. निविदा शुल्काची रक्कम व बयाना रक्कमेशिवाय सादर केलेली निविदा स्विकृत केली जाणार नाही.

५) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

६) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसुचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. सदर दाखला एकूण वार्षिक निविदा मुल्याच्या अंदाजे ३०% रक्कमे इतका असावा.

७) ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

८) महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" हे काम नियमीत व वेळेतच होण्याकरीता निविदाधारकाचे कार्यक्षेत्र हे मुंबई, नवी मुंबई व ठाणे या परिक्षेत्रातील असावे.

९) ई–निविदाधारकास देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, हॉटेल्स, रूग्णालये, शासकीय कार्यालये वगैरे ठिकाणी स्वयंपाक, भोजन किंवा मिष्ठान्न बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

१०) निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा. तसेच निविदाधारक संस्थेची कॅटरींग क्षेत्रात मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल २० लक्षा पेक्षा जास्त असावी. (कोविड कालावधी वगळून)

## अटी व शर्ती

१) महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" या कंत्राटाचा कालावधी हा कामाचे आदेश दिलेपासून ते ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असेल. तसेच पुढिल वर्षाकरीताची ई–निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन कंत्राटदाराची नेमणूक होईपर्यंत सदर काम हे चालू वर्षाच्या मान्य दराने करावे लागेल. त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

२) ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" या संबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

३) पूर्ण माहिती भरलेली ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपुर्ण ई–निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. ई–निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे देणे व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

४) निविदा मान्य झालेल्या कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत वार्षिक निविदा रक्कमेच्या ५% रक्कम बॅक गॅरेंटी म्हणून १ वर्षासाठी न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेसोबत ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फत सादर केलेली बयाना रक्कम रू. ३०,०००/– वजा करून उर्वरीत रक्कमेची बॅक गॅरेंटी जमा करावी लागेल.

५) कंत्राट कालावधीत नमूद केलेल्या महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" या कामाच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" हे काम करावे लागल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

६) महाप्रसादाची नारळवडी बनविण्याकरीता लागणारा कच्चा माल (नारळ व साखर), लागणारी सर्व भांडी गॅस शेगडया, कढया, पाईप नॅचरल गॅस कनेक्शन तसेच महाप्रसादाची नारळवडी पॅकिंगकरीता लागणारे पॅकेजींग मटेरीयल (प्लास्टीक रोल व कागदी बॉक्स्) न्यासातर्फे कंत्राटदारास पुरविण्यात येईल. त्याचप्रमाणे पॅकेजींग मशिन्सुही न्यासातर्फे कंत्राटदारास देण्यात येतील.

७) गर्दीच्या दिवशी (शनिवार, रविवार, मंगळवार, सार्वजनीक सुट्टी तसेच उन्हाळी, दिवाळी व नाताळ या शालेय सुट्टया) किंवा उत्सवामध्ये (संकष्टी चतुर्थी, अंगारकी संकष्टी चतुर्थी, भाद्रपद श्री गणेश चतुर्थी उत्सव व माघ श्री गणेश जयंती महोत्सव) महाप्रसादाच्या नारळवडीची प्रचंड मागणी असते. अशावेळी २ दिवस अगोदरपासून जादा प्रमाणात नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे ही कामे करणे तसेच त्याकरीता लागणाऱ्या जादा कामगारांची व्यवस्था करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

८) कंत्राट कालावधीमध्ये "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" ही कामे करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे कच्च्या मालाचे, तयार मालाचे किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई करून घेण्यात येईल. सदर रक्कम कंत्राटदाराच्या बिलातून वजा करण्यात येईल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## अटी व शर्ती

९) महाप्रसादाची नारळवडी पॅकिंग करुन न्यासाकडे सुपूर्द करताना नग व वजन या दोन्हीचे तपशिल कंत्राटदाराने देणे आवश्यक राहतील. न्यासाकडून देण्यात आलेला कच्चा माल आणि उत्पादीत महाप्रसादाच्या नारळवडीचे वजन यांचे प्रत्यक्ष गणन करुन त्याप्रमाणातच महाप्रसादाची नारळवडी उत्पादीत होणे आवश्यक आहे. कच्च्या मालाच्या प्रमाणात उत्पादन झाले नाही तर कंत्राटदाराचे सदर कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल.

१०) महाप्रसाद विभागाच्या परिसरात प्रसादाची चोरी, गहाळ होणे असे प्रकार होऊ नये याची व्यवस्था करावी.

११) न्यासाचे अंतर्गत लेखा परिक्षक यांनी वेळोवेळी मागितलेले तपशिल अचूक व वेळेमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावे.

१२) कंत्राटदाराने कच्च्या माल व स्वयंपाक गृहातील वस्तू/मालमत्ता काळजीपूर्वक/जबाबदारीने वापरणे.

१३) कंत्राटदाराने स्वयंपाक गृहासह संपुर्ण महाप्रसाद विभागाची, महाप्रसादाकरीता वारण्यात येणाऱ्या भांडयांची व पॅकिंग मशीन्स्‌ची साफसफाई करणे आवश्यक असेल.

१४) नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे या कामाकरीता लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रतिदिन २० पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१५) कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा दाखला (Health Card), कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र कंत्राटदाराने न्यासास देणे आवश्यक आहे.

१६) कंत्राट कालावधीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), हॅन्डग्लोज, शॉवर कॅप, ॲपरॉन देणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे. FDA व FSSAI यांचे महाभोग च्या सर्व अटींची व प्रमाणकांची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१७) कंत्राट कालावधीत कार्यरत असणाऱ्या सर्व कामगारांची वैद्यकीय तपासणी प्रत्येक सहा महिन्याला करण्यात यावी. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे. त्याबाबतच्या तपासणी अहवालाची एक प्रत महाप्रसाद विभागाला सादर करावी लागेल.

१८) कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास फौजदारी गुन्हा दाखल करुन वसूल केले जाईल. तसेच सदर कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यात येईल.

१९) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या सर्व कामगार व कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारची देणी, त्यांचा नोकरी हक्क व इतर बांधिलकी ही सर्वस्वी कंत्राटदाराची राहील.

२०) कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

## अटी व शर्ती

२१) कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास अशा कर्मचाऱ्याला तात्काळ कामावरुन कमी करण्यात यावे व त्यांनी केलेल्या अपहाराची भरपाई कंत्राटदाराने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. तसेच कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. जुन्या व नव्याने नियुक्त करतांना कामगारांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणेबाबत संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२२) मान्य मजूरी दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" हे काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णतः बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

२३) न्यासाने "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" हे दिलेले काम वेळेत न केल्यास, कामात चालढकल करत असल्यास, कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, लेखी आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक किंवा दर्जाहीन काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहिल.

२४) कामाचे आदेश (Work Order) दिल्यानंतर १५ दिवसांत समक्ष येवून रु. ५००/– च्या गैरन्यायीक/न्यायीक स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास कंत्राटदाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२५) कंत्राट आदेश व मजूरी बिलाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील.

२६) श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त कंत्राटदाराला कार्यादेश देवू शकतो.

२७) ई–निविदा भरतांना सर्व प्रकारचे खर्च मिळून व जी. एस. टी वगळून (Excluding GST) रक्कम भरावी.

२८) सदरची ई–निविदा कार्यादेश नसून फक्त बीड ऑफ कोटेशन (BOQ) मागविण्यासाठी आहे.

२९) ज्या दिवशी ई–निविदा ऊघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## अटी व शर्ती

३०) कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये निविदाधारक स्वत:च्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने त्यांची नियुक्ती करताना न्यासाच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित होणार/राहणार नाही.

३१) कमी जास्त दराची कोणतीही ई–निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार न्यासाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास बंधनकारक राहणार नाही.

३२) या मजूरी कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्रोव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. यापैकी कोणतीही जबाबदारी न्यास घेणार नाही. कर्मचारी वेतन कायदा १९३६, कर्मचारी नुकसान भरपाई १९६१, कर्मचारी जबाबदार कायदा १९३८, कर्मचारी नियमीत करणे व काढून टाकणेचा कायदा १९७९ नुसार वेळोवेळी झालेल्या कायदेशीर सुधारणा कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

३३) किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं. १ मधील किमान वेतन दर पकडण्यात यावेत.

३४) कंत्राट कालावधीत आपल्यामार्फत नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार कंपनीमार्फत संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

३५) कंत्राटदार यांचेकडील कामगारांना राहण्याची/निवासाची व्यवस्था न्यासाकडून पुरविली जाणार नाही.

३६) कंत्राट कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांस कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट तरतूदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी घेणे व सदर विमा पॉलिसीची प्रमाणित प्रत न्यासाकडे १५ दिवसाचे आत दाखल करणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३७) जीएसटी, व्यवसाय कर, भ. नि. नि. योजना व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

३८) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

## अटी व शर्ती

३९) कंत्राटदाराची साईटवरील इन्चार्ज किंवा पर्यवेक्षण करणारी व्यक्ती पूर्ण व्यवस्थापन नियोजन व सर्व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणेसाठी असेल. त्यांनी न्यास कार्यालयाच्या व्यवस्थापक/पर्यवेक्षक/सहा. पर्यवेक्षक याचे बरोबर समन्वय साधला पाहिजे.

४०) ई–निविदे मध्ये नमूद केलेल्या कामामध्ये कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

४१) न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर दरमहा बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

४२) ई–निविदेत नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम दिल्याचे आढळल्यास कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करून त्याची न्यासाकडे जमा असलेली संपुर्ण बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

४३) या कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

४४) कंत्राटदारास सदरचे काम मिळाल्यानंतर त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारातील रक्कम कमी जास्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४५) महाप्रसादाची नारळवडी बनविण्यासाठीचे स्वयंपाकगृह, महाप्रसाद बनविणे व पॅकिंग करण्याच्या प्रक्रियेची पाहणी करण्याकरीता महाप्रसाद विभागात सोमवार ते शनिवार या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत भेट देऊ शकता.

४६) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

४७) ई–निविदामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–२४२२४४३८, ०२२–२४२२२०७२ वर विस्तारीत क्र. १६१ वर संपर्क करावा.

४८) **संकेतस्थळाच्या माहीतीकरीता टोल फ्री क्र. १८००–३०७०–२२३२, टोल फ्री मो. क्र. ७८७८००७९७२.**

आपली स्नेहांकित,

(नंदा राऊत)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## महाप्रसादाची नारळवडी बनविण्याच्या कामाचा तपशील

अ) नारळवडी बनविण्याकरीता नारळाचा कीस व साखर वापरण्यात येते.

ब) महाप्रसादाची नारळवडी बनविण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाचा वजनानुसार तपशील खालीलप्रमाणे –

| कच्च्या मालाचा तपशील | कच्च्या मालाचे वजन | तयार नारळवडी | नारळवडीचे एकूण नग (प्रति नग २५ ग्रॅम प्रमाणे) |
|---|---|---|---|
| नारळाचा कीस | ७५ किलो | – | – |
| साखर | ५० किलो | – | – |
| **एकूण वजन** | **१२५ किलो** | **१०० किलो** | **४,००० नग** |

क) १०० किलो नारळवडी बनविण्याकरीता वापरण्यात येणारा नारळाचा कीस व त्याच्या वजनाच्या २/३ (दोन तृतिआंश) इतकी साखर वापरण्यात येते. (उदा. ७५ किलो नारळाचा कीस यानुसार ५० किलो साखर)

ड) १. नारळवडी नग – प्रति किलोत अंदाजे ४० नग इतके बनविण्यात येतील.
२. नारळवडीचा आकार – लांबी ४.५ से. मी., रूंदी ४.५ से. मी., उंची (जाडी) १.५० ते १.७५ से. मी. इतकी असेल.
३. नारळवडीचे वजन – प्रति नग २५ ग्रॅम इतके असेल.
४. प्रतिदिन नारळवडीचे उत्पादन – ४०० किलो / १६,००० नग

इ) **खालीलप्रमाणे नारळवडी महाप्रसाद बनवून व पॅकिंग करण्यात येईल.**

| अ.क्र. | कामाचा तपशील | प्रमाण (प्रतिदिन दिन) नग व वजन | प्रति दिन पॅकिंग करावयाची नारळवडी |
|---|---|---|---|
| १ | महाप्रसादाची नारळवडी | नग १६,००० नग व वजन ४०० किलो | पाऊच पॅकिंग (४ नग चे १ पाकिट) – ३,००० पाकिटे<br>बॉक्स पॅकिंग (१० नग चा १ बॉक्स) – ४०० बॉक्स |

टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.

| अ.क्र. | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इटरनेट बॅकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / ट्रेडिंग लायसेन्स |
| ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड |
| ५ | पी. एफ. रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | प्रोफेशनल टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत. |
| ७ | कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | जी एस टी नोंदणी दाखला |
| १० | राष्ट्रीयकृत बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) पान क्र. ३ वरील अट क्र. ६ नुसार |
| ११ | आर्थिक वर्ष (२०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२) आय. टी. आर. रिटर्नस |
| १२ | आर्थिक वर्ष (२०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२) जी. एस. टी. रिटर्नस |
| १३ | सन (२०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२) यापैकी कमाल आर्थिक उलाढीलीच्या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सी. ए. (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र. (पान क्र. १४ वरील नमुन्यानुसार) (कोविड कालावधी वगळून)<br>**टिप – ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल २० लक्ष पेक्षा जास्त असावी.** |
| १४ | अनुभवाचा तपशील (सद्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयीचे कार्यादेशाच्या सत्यप्रती.) |
| १५ | हमी पत्र (पान क्र. १२ नुसार) |
| १६ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी / संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation latter) |
| १७ | मूळ निविदा (वाणिज्यीक Commercial) BOQ |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

**निविदाधारकाने खालिलप्रमाणे प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची कागदपत्रे.**

| अ.क्र. | न्यासास सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / ट्रेडिंग लायसेन्स |
| ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड |
| ५ | पी. एफ. रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | प्रोफेशनल टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत. |
| ७ | कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | जी एस टी नोंदणी दाखला |
| १० | राष्ट्रीयकृत बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) पान क्र. ३ वरील अट क्र. ६ नुसार |
| ११ | आर्थिक वर्ष (२०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२) आय. टी. आर. रिटर्नस |
| १२ | आर्थिक वर्ष (२०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२) जी. एस. टी. रिटर्नस |
| १३ | सन (२०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२) यापैकी कमाल आर्थिक उलाढीलीच्या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सी. ए. (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र. (कोविड कालावधी वगळून) (पान क्र. १४ वरील नमुन्यानुसार)<br>**टिप – ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल २० लक्ष पेक्षा जास्त असावी.** |
| १४ | अनुभवाचा तपशील (सद्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयीचे कार्यादेशाच्या सत्यप्रती.) |
| १५ | हमी पत्र (पान क्र. १२ नुसार) |
| १६ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी / संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation latter) |
| १७ | मूळ निविदा (वाणिज्यीक Commercial) BOQ |

# हमीपत्र

दिनांक – / /२०२३

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

मी/आम्ही ———————————————————————— खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार महाप्रसादाची "नारळवडी बनविणे व पॅकिंग करणे" हे काम आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये जीएसटी वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालवधीत न्यासाने विहीत केल्यानुसार बॅक गॅरंटी देण्यास आम्ही बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी आमच्या काम करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

निविदाधारकाची सही व शिक्का

(फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

## निविदाधारकाबाबतची माहिती

१) संस्थेचे/फर्मचे नांव/व्यक्तीचे नांव :------------------------------------------------

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

ब. दूरध्वनी क्र. :------------------------------------------------

क. भ्रमणध्वनी (मोबाईल) :------------------------------------------------

ड. ई–मेल :------------------------------------------------

२) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव (हुद्दयासह) :------------------------------------------------

अ. भ्रमणध्वनी (मोबाईल) :------------------------------------------------

३) जीएसटी नोंदणी क्र. :------------------------------------------------

४) आयकर नोंदणी पॅन क्र. :------------------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

(सी. ए. यांच्या लेटरहेडवर)

**वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र**

दाखला देण्यात येतो की, मे. ..............................................................................

यांच्या व्यवसायाची वर्ष २०१८–२०१९, २०१९–२०२०, २०२०–२०२१, २०२१–२०२२ या पैकी कमाल आर्थिक उलाढालीच्या ३ वर्षांच्या उलाढालीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. (कोविड कालावधी वगळून)

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| | एकूण उलाढाल | |

दिनांक :– / / २०२३

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटन्ट
(नांव/सही शिक्का)

नोंदणी क्रमांक :–